MHST090000062022

नि.दि.मु.क्र.०३/२०२२
अंकुश तुकाराम साळुंखे
विरुध्द
सुनंदा सोपान साळुंखे वगैरे,

**नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक ०३/२०२२ मधील निशाणी २७ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ हिने वादींचे विरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ क्रम १ नुसार, दावा मिळकत गट क्र. १११ यामध्ये उभे असलेले ज्वारीचे पिक जोपासणेस व काढणेस वादींनी प्रस्तुत प्रतिवादी यांना हरकत अडथळा करु नये म्हणून दाव्याचे अंतिम निकालापर्यंत तुर्तातुर्त ताकीद देणेकरीता दाखल केलेला आहे.

**प्रतिवादी क्र. १ यांच्या प्रस्तुत अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे**

२. दावा मिळकत गट क्र. १११ क्षेत्र २ हेक्टर ५४ आर पैकी ०.७९ आर ही मिळकत प्रस्तुत अर्जाचा वाद विषय आहे. (सदर मिळकतीस यापुढे वाद मिळकत म्हणून संबोधण्यात येईल)

३. वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान दिनांक २४.०६.२०१० रोजी तंटामुक्ती समिती पिंपोडे बुद्रुक, तालुका कोरेगाव, जिल्हा सातारा यांचे समक्ष अपापसात वाटप झालेले असून तसा तडजोडनामा झालेला आहे. सदर तडजोडनाम्यानुसार वर नमुद वाद मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या संमतीने व तंटामुक्ती अध्यक्ष व साक्षीदार यांचे समोर प्रतिवादी क्र. १ हिला देण्यात आलेली आहे. दिनांक २४.०६.२०१० रोजीच्या तडजोडनाम्याचे पासून आज अखेर प्रतिवादी क्र. १ हिची वाद मिळकतीमध्ये कब्जे वहिवाट आहे. प्रतिवादी हे या मिळकतीत जिराईती पिके घेतात. चालू साली प्रतिवादीने ट्रॅक्टर चालक पोपट साळुंखे यांच्या सहाय्याने वाद मिळकतीमध्ये जोंधळा पेरलेला आहे. सदर पिकाची देखभाल प्रतिवादी करीत आले आहेत. वाद मिळकतीशी वादींचा कोणत्याही प्रकारे कसलाही हितसंबंध नाही. परंतु वादींनी प्रतिवादी क्र. १ चा मुलगा गावी आल्याचे पाहून प्रतिवादींचे विरुध्द वाठार पोलिस ठाण्यात खोटी फिर्याद दाखल केली. प्रतिवादी क्र. १ ही विधवा बाई असून तिचा मुलगा नोकरी निमित्त बाहेर गावी असतो. वाद मिळकतीमध्ये जोंधळयाचे पिक आहे. सदरचे पिक प्रतिवादींनी केलेले आहे. वादी वाद मिळकतीमध्ये येवून प्रतिवादींच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करीत

आहेत. त्यामुळे वाद मिळकतीमधील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये म्हणून वादींना तुर्तातुर्त ताकीद देणे गरजेचे आहे. तसे न झाल्यास वादी हे वाद मिळकतीमधील उभ्या पिकाची नुकसानी करु शकतात. सबब वादींनी वाद मिळकतीत येवून प्रतिवादींच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये म्हणून तुर्तातर्त ताकीद देण्याची विनंती केली.

४. वादीने प्रस्तुत अर्जास म्हणणे (निशाणी ३५) दाखल करुन प्रस्तुतचा अर्ज नाकारला. वादीच्या म्हणण्यानुसार, वादी व प्रतिवादी यांचेमध्ये वाटप झालेले नाही. तसेच त्याची नोंद दावा मिळकतीस झालेली नाही. तथाकथीत वाटपाचे वेळी वादीची आई जिवंत होती. तसेच प्रतिवादी क्र. ४ हिला देखील वाटपातून वगळलेले आहे. त्यामुळे तथाकथीत वाटप हे योग्य नसून घटनाबाहय आहे. दावा मिळकत गट क्र. १९६९ ही स्वकष्टार्जित असून ती वादी क्र. २ याने खरेदी घेतलेली आहे. तसेच गट क्र. १११ ही वादी क्र. १ याने दिनांक २२.०५.१९८४ रोजी खरेदी घेतलेली आहे. वाद मिळकत गट क्र. १११ ही वादीच्या खरेदी मालकीची व कब्जे वहिवाटीची मिळकत असून त्याच्याशी प्रतिवादींचा काहीही संबंध नाही. प्रतिवादींना प्रस्तुतचा तुर्तातुर्त ताकीद अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ क्रम १ नुसार देता येणार नाही. वादी व प्रतिवादी हे एकाच कुटुंबातील सह हिस्सेदार आहेत. वडिलोपार्जित मिळकतीमध्ये कब्जे वहिवाट ही एकत्रात आहे. त्यामुळे प्रतिवादीला वादींचे विरुध्द तुर्तातुर्त ताकीद मागता येणार नाही. वाद मिळकत गट क्र. १११ चे वाटप तंटामुक्ती समितीच्या पंच मंडळींना करण्याचा अधिकार नव्हता व नाही. त्यामुळे तथाकथीत तडजोडनामा हा कायदेशीर नाही. प्रतिवादींना प्रथमदर्शनी केस नाही. प्रतिवादी हे खोटया तक्रारी करुन वादींना वाद मिळकतीतून हुसकावून लावण्याचा प्रयत्न करीत आहेत. प्रतिवादी हे न्यायालयासमोर स्वच्छ हाताने आलेले नाहीत. न्यायाचा तराजू प्रतिवादीचे बाजूने नाही. प्रतिवादींचे मागणी केल्याप्रमाणे तुर्तातुर्त ताकीद दिल्यास वादीचे कधीही पैशाने न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. सबब प्रतिवादींचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

५. प्रस्तुतचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी यांचे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज व त्यावरील म्हणणे यांचे अवलोकन केले असता, खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष व त्याबाबतची कारणमिमांसा ही खालीलप्रमाणे–

| अनु. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादीस प्रथमदर्शनी केस आहे काय ? | होय |
| २. | न्यायाचा तराजू हा प्रतिवादीच्या बाजूने आहे काय ? | होय |
| ३. | तुर्तातुर्त मनाई न दिल्यास प्रतिवादीचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | होय |
| ४. | अंतिम आदेश काय ? | ताकीद अर्ज मंजूर |

६. वादीने कागद यादी निशाणी ३ सोबत दावा मिळकत गट क्र. २३३६ चा ७/१२ उतारा, गट क्र. २३०८ चा ७/१२ उतारा, गट क्र. २३०७ चा ७/१२ उतारा, गट क्र. १८२४ चा ७/१२ उतारा, गट क्र. १११ चा ७/१२ उतारा, गट क्र. १९६९ चा ७/१२ उतारा, गट क्र. ११४ चा ७/१२ उतारा, गट क्र. १५४ चा ७/१२ उतारा, सहाय्यक पोलिस निरीक्षक वाठार पोलिस ठाणे यांचे तहसिलदार यांना दिनांक २१.०७.२०२१ रोजीच्या पत्राची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. वादीने कागद यादी निशाणी ३४ सोबत दिनांक २२.०५.१९८४ रोजीच्या खरेदीखताची मुळप्रत, दिनांक १६.१२.१९९७ रोजीच्या खरेदीखताची मुळ प्रत, फेरफार क्र. ९४१५ चा फेरफार उता–याची खरी नक्कल, फेरफार क्र. ११५५३ चा फेरफार उता–याची खरी नक्कल दाखल केलेली आहे. तसेच वादीने कागद यादी निशाणी ३९ सोबत फेरफार क्र. १ ची फेरफार उता–याची खरी नक्कल व गट क्र. २४६२ चा सन १९८५–८६ चा ७/१२ उतारा दाखल केलेला आहे.

७. प्रतिवादी क्र. १ हिने कागद यादी निशाणी २९ सोबत तहसिलदार यांचेकडील सी.आर.पी.सी.क्र.१४५/२०८/२०२१ मधील वादीने दिलेल्या अर्जाची प्रत, अदखलपात्र गुन्हा नोंद झालेबाबत एन.सी.आर.ची नक्कल दाखल केलेली आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ ने कागद यादी निशाणी ३७ सोबत वादी व प्रतिवादी यांचेमधील तंटामुक्ती अध्यक्ष यांचेसमोर झालेला तडजोडनामाची छायांकित प्रत दाखल केलेली आहे.

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ बाबत

८. प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज वाद मिळकत गट क्र. १११ मध्ये उभ्या असलेल्या

पिकास जोपासणेस व काढणेस तसेच वाद मिळकतीमधील कब्जे वहिवाटीस वादींनी हरकत अडथळा करु नये म्हणून वादीचे विरुध्द तुर्तातुर्त ताकीद देणेकरीता दाखल केलेला आहे.

९. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ क्रम १ नुसार वादातीत मिळकत ही विरुध्द पक्षकार तबदिल करण्याच्या प्रयत्नात आहे अथवा वादातीत मिळकत ही नष्ट करण्याच्या प्रयत्नात आहे असे दिसून आल्यास अथवा प्रतिवादी हे वादीला दावा मिळकतीमधून हुसकावून लावण्याची शक्यता आहे असे दिसून आल्यास विरुध्द पक्षकाराच्या कृतीला न्यायालयास प्रतिबंध करता येईल.

१०. वादी तर्फे विधिज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, वाद मिळकतीमधील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये म्हणून केवळ वादी हा दाद मागू शकतो. वादीतर्फे विधिज्ञ यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ क्रम १ नुसार केवळ वादी हा अशा प्रकारची दाद मागू शकतो, त्यामुळे प्रतिवादींचा प्रस्तुतचा अर्ज चालण्यास पात्र नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ क्रम १ (क) मधील तरतुदीचा विचार करता प्रतिवादी हा वादीच्या कब्जे वहिवाटीस हरकत करीत असेल तर, किंवा वाद मिळकतीबाबत वादीला इजा पोहचविण्याचा प्रयत्न करीत असेल तर, न्यायालयाला सदर कृतीस प्रतिबंध करता येईल. सदर नमुद तरतुदीचा विचार करता केवळ वादी हा सदर पोट कलमानुसार दाद मागण्यास पात्र आहे असे दिसून येते. परंतु दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ९४ (इ) मधील तरतुदीनुसार न्यायालयाला योग्य व संयुक्तिक वाटेल अशा प्रकारे दरम्यानचे आदेश पारीत करण्याचे न्यायालयास अधिकार आहेत. तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ नुसार न्यायालयाला योग्य वाटेल व कायदयाच्या दृष्टीने हितावह असेल असे आदेश पारीत करण्याचे न्यायालयाला अधिकार आहेत. त्यामुळे प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ९४ नुसार व कलम १५१ नुसार चालण्यास पात्र आहे.

११. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दावा मिळकत गट क्र. १११ मध्ये त्यांच्या असणा–या कब्जे वहिवाटीस वादीने हरकत अडथळा करु नये म्हणून वादीला तुर्तातुर्त ताकीद देणेबाबत दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रथमतः प्रतिवादींना दावा मिळकतीमध्ये त्यांची कब्जे वहिवाट आहे हे शाबीत करणे गरजेचे आहे.

१२. वादीने निशाणी १२ वर दावा मिळकत गट क्र. १११ चा ७/१२ उतारा दाखल

केलेला आहे. सदर ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता वादी क्र. १ याचे नावे ७९.३७ आर क्षेत्रास भोगवटादार सदरी लागले असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. वादीच्या कथनानुसार सदर मिळकतीमध्ये वादी क्र. १ याची कब्जे वहिवाट आहे. याउलट प्रतिवादी क्र. १ हिने दावा मिळकत गट क्र. १११ मध्ये तिची वहिवाट असल्याचे प्रस्तुत अर्जामध्ये कथन केलेले आहे. प्रतिवादी क्र. १ हिने कागद यादी निशाणी २९ वर वादी क्र. १ याने तहसिलदार यांना दिनांक ०६.१२.२०२१ रोजी दिलेल्या अर्जाची प्रत दाखल केलेली आहे. सदर अर्जाचे अवलोकन केले असता वादी याने गट क्र. १११ मध्ये प्रतिवादी क्र. १ हिने दिनांक १६.१०.२०२१ रोजी रात्री जबरदस्तीने पेरणी केली असल्याचे कळविल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी दिनांक १६.१०.२०२१ रोजी पासून प्रतिवादी क्र. १ हिची दावा मिळकत गट क्र. १११ मध्ये वहिवाट असल्याचे वादी क्र. १ यांनी मान्य केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

१३. वादीने तद्नंतर कागद यादी निशाणी २९ सोबत दिनांक २१.१०.२०२१ रोजीचे अदखलपात्र गुन्हा नोंद झाल्याचे अदखलपात्र गुन्हयाचा अहवाल दाखल केलेला आहे. सदर अदखलपात्र गुन्हयाचा प्रथम अहवाल पाहिला असता त्यामध्ये वादी क्र. १ याच्या पत्नीने प्रतिवादी क्र. १ हिचे विरुध्द तक्रार दिली असल्याचे व त्यामध्ये गट क्र. १११ मध्ये प्रतिवादी क्र. १ हिने पेरणी केली असल्याचे स्पष्टपणे नमुद असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे सदर कागदपत्राचे अवलोकन केले असता वाद मिळकत गट क्र. १११ मध्ये प्रतिवादी क्र. १ हिची कब्जे वहिवाट असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

१४. प्रतिवादीने तद्नंतर कागद यादी निशाणी ३७ सोबत वादी व प्रतिवादी यांचेमध्ये तंटामुक्ती समिती यांचेसमोर झालेल्या तडजोडनाम्याची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. सदर तडजोडनाम्याचे अवलोकन केले असता त्यावर वादी व प्रतिवादी क्र. १ यांची स्वाक्षरी असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच दावा मिळकत गट क्र. १११ ही प्रतिवादी क्र. १ सुनंदा साळुंखे हिच्या वाटपास देण्यात आल्याचे वादी व प्रतिवादी यांनी मान्य केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सदर तडजोडनामा हा दिनांक २४.०६.२०१० रोजीचा असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सदर तडजोडनाम्याबाबत वादीने आज अखेर कोठेही दाद मागितली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. तसेच सदर तडजोडनामा हा खोटा व बेकायदेशीर आहे याबाबत प्रथमदर्शनी वादीने कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे सदर तडजोडनाम्यानुसार प्रतिवादी क्र. १ हिची दावा मिळकत गट क्र. १११ मध्ये कब्जे वहिवाट

असल्याची शक्यता प्रथमदर्शनी दिसून येत आहे. याउलट दावा मिळकत गट क्र. १११ मध्ये वादी क्र. १ याची कब्जे वहिवाट असलेबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा वादीने प्रथमदर्शनी अभिलेखावर दाखल केलेला नाही.

१५. वादीच्या विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, दावा मिळकत गट क्र. १११ ही वादी क्र. १ याची स्वकष्टार्जित मिळकत आहे व सदरची मिळकत ही त्याने दिनांक २२.०५.१९८४ रोजी खरेदी घेतलेली आहे व त्याचे मुळ खरेदीपत्र वादीने या कामी दाखल केलेले आहे. वादीने कागद यादी निशाणी ३४ सोबत दिनांक २२.०५.१९८४ रोजीचे खरेदीपत्र दाखल केलेले आहे. सदर खरेदीपत्राचे अवलोकन केले असता, सदरचे खरेदीपत्र हे पिंपोडे बुद्रुक येथील सर्वे क्र. २६३० चे असलेबाबत प्रथमदर्शनी दिसून येत आहे. सदरची मिळकत ही वादी क्र. १ याने व बाळकृष्ण अबाजी साळुंखे यांनी खरेदी केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. वादीच्या कथनानुसार, सर्वे क्र. २६३० चा नवीन गट क्र. १११ आहे. वादीने कागद यादी निशाणी ३९ सोबत फेरफार क्र. १ चा उतारा दाखल केलेला आहे. सदर फेरफार उता–याचे अवलोकन केले असता गट क्र. १११ चा जुना गट क्र. २४६२ असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. परंतु सदर गट क्र. १११ याचा पुर्वीचा सर्वे क्र. २६३० असलेबाबत सदर फेरफार उता–यामध्ये कोठेही नमुद केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. तसेच अभिलेखाचे अवलोकन केले असता सर्वे क्र. २६३० चा नवीन गट क्र. १११ झाला याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा वादीने अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे अभिलेखावर दाखल केलेले दिनांक २२.०५.१९८४ रोजीचे खरेदीपत्र हे प्रथमदर्शनी गट क्र. १११ चे असल्याबाबत प्रथमदर्शनी साशंकता निर्माण होत आहे.

१६. वर कथन केल्याप्रमाणे दावा मिळकत गट क्र. १११ ही वादीची स्वकष्टार्जित मिळकत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. याउलट दावा मिळकत गट क्र. १११ यामध्ये प्रतिवादी क्र. १ हिची कब्जे वहिवाट असल्याचे वादी क्र. १ याने दिनांक ०६.१२.२०२१ रोजीच्या तहसिलदार यांना दिलेल्या अर्जामध्ये मान्य केले असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. याउलट वाद मिळकतीमध्ये वादी क्र. १ याची कब्जे वहिवाट आहे हे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा प्रथमदर्शनी अभिलेखावर दाखल नाही. त्यामुळे प्रतिवादी यांच्या प्रस्तुत अर्जातील कथनांचा विचार करता प्रतिवादी यांना प्रस्तुत अर्जास अनुसरुन प्रथमदर्शनी केस आहे असा निष्कर्ष काढणे न्यायोचित दिसून येत आहे. सबब मुद्दा क्र. १ बाबत मी

होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. २ व ३ बाबत**

१७. वर कथन केल्याप्रमाणे दावा मिळकत गट क्र. १११ मध्ये प्रतिवादी क्र. १ हिची कब्जेवहिवाट असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. तसेच अभिलेखाचे अवलोकन केले असता वादीने दावा मिळकत गट क्र. १११ मध्ये प्रतिवादी क्र. १ हिची कब्जेवहिवाट असल्याचे मान्य केल्याचे दिनांक ०६.१२.२०२१ रोजीच्या वादी याच्या तहसिलदार यांना दिलेल्या अर्जावरुन प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे सदर अर्जातील कथनांचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा दाखल करणेचे पुर्वीपासून प्रतिवादी क्र. १ हिची वाद मिळकतीमध्ये कब्जे वहिवाट असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. प्रतिवादी क्र. १ हिने दावा मिळकतीमध्ये ज्वारीचे पिक केले असल्याचे कथन केलेले आहे. वादी क्र. १ यांनी दिनांक ०६.१२.२०२१ रोजीच्या तहसिलदार यांना दिलेल्या अर्जाचे अवलोकन केले असता दावा मिळकत गट क्र. १११ मध्ये प्रतिवादी क्र. १ हिने पेरणी केली असल्याचे वादी क्र. १ याने मान्य केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच दिनांक १२.१०.२०२१ रोजीच्या अदखलपात्र गुन्हा नोंद केलेबाबतच्या अहवालाचे अवलोकन केले असता वादी क्र. १ याच्या पत्नीने गट क्र. १११ यामध्ये प्रतिवादी क्र. १ हिने पेरणी केल्याचे कथन केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे उपलब्ध अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. १ हिने दावा मिळकत गट क्र. १११ मध्ये ज्वारीचे पिक केले असल्याची शक्यता प्रथमदर्शनी दिसून येत आहे. वादीने वाद मिळकतीमधील प्रतिवादी क्र. १ हिची कब्जे वहिवाट नाकारलेली आहे. परंतु उपलब्ध अभिलेखानुसार दावा मिळकत गट क्र. १११ मध्ये प्रतिवादी क्र. १ हिची कब्जे वहिवाट असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे वादी याने प्रतिवादी क्र. १ हिची कब्जे वहिवाट नाकारल्याने व दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ हिचे ज्वारीचे पिक असल्याचे दिसून येत असल्याने वादी हे प्रतिवादी क्र. १ हिच्या वाद मिळकत गट क्र. १११ मधील कब्जे वहिवाटीस हरकत करीत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी क्र. १ हिला वाद मिळकतीमध्ये हरकत केल्यास ज्वारीचे पिक जोपासण्यास व काढण्यास प्रतिवादी हिला गैरसोय होणार असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच वादी यांनी प्रतिवादी क्र. १ हिला ज्वारीचे पिक जोपासण्यास व काढण्यास हरकत केल्यास त्याद्वारे प्रतिवादी क्र. १ हिला ज्वारीच्या पिकाबाबत अपरिमित नुकसान होणार असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

याउलट वादी यांना दावा मिळकत गट क्र. १११ मधील प्रतिवादी क्र. १ हिच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये म्हणून तुर्तातर्त ताकीद दिल्यास तुलनेने वादी यांची कोणतीही गैरसोय होणार नाही अथवा वादी यांना कोणतेही नुकसान होणार नाही. सबब मुद्दा क्र. २ व ३ बाबत मी होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ४ बाबत.**

१८. प्रतिवादी क्र. १ हिने प्रस्तुतच्या अर्जातील कथनांना अनुसरुन तिला प्रथमदर्शनी केस आहे ही बाब प्रथमदर्शनी सिध्द केलेली आहे. तसेच न्यायाचा तराजू हा प्रतिवादी क्र. १ हिच्या बाजूने आहे असे दिसून येते. तसेच मागणी केल्याप्रमाणे तुर्तातुर्त ताकीद न दिल्यास प्रतिवादी क्र. १ हिचे अपरिमित नुकसान होणार आहे हे प्रतिवादी क्र. १ हिने प्रथमदर्शनी शाबीत केलेले आहे. सबब प्रतिवादी क्र. १ हिच्या दावा मिळकत गट क्र. १११ मध्ये असलेल्या ज्वारीचे पिक जोपासण्यास व काढण्यास वादींनी हरकत अडथळा करु नये म्हणून वादींना तुर्तातुर्त ताकीद देणे न्यायोचित दिसून येत आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रतिवादी क्र. १ हिचा तुर्तातुर्त ताकीद अर्ज (निशाणी २७) मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी वाद मिळकत गट क्र. १११ मधील प्रतिवादी क्र. १ हिच्या कब्जे वहिवाटीस कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा करु नये म्हणून तसेच वाद मिळकतीमध्ये उभे असलेल्या ज्वारीच्या पिकास जोपासण्यास अथवा काढण्यास वादी यांनी हरकत अडथळा करु नये म्हणून वादी यांना प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत तुर्तातर्त ताकीद देण्यात येते.

३. खर्चासंबंधी आदेश नाहीत.

Digitally signed by SAMEER GOPAL GUNARI
Date: 2022.02.18 15:15:59 +05'30'

**(समीर गोपाळ गुणारी)**

**दिनांक –१६.०२.२०२२** **२वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर,**

**ठिकाण –कोरेगाव** **कोरेगाव**